**नियमित दिवाणी दावा क्र. १३१/२०१९**
**निशाणी क्र. ५५ सोबत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुढील सरतपास वादी तर्फे वकील श्री. ए. जी. पठाण यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

३. आता मला दिनांक १९/०३/१९९६ रोजीचे मुळ खरेदीखत दाखविले ते तेच असुन त्यावर ओळखदार म्हणुन मी अ.क्र. २ वर सही केलेली आहे. त्यास **निशाणी ५६** देण्यात आली.

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. डी. टी. मांडगे यांचेमार्फत शपथेवर सुरुः</u>**

४. मी न्यायालयात आज रोजी वादीच्या सांगण्यावरुन साक्ष देण्यासाठी आलेलो आहे. वादीने खरेदीखतासंदर्भात न्यायालयात साक्ष द्यायची आहे असे मला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर वादीच्या सांगण्यावरुन वादी तर्फे विधीज्ञ यांनी शपथपत्रामध्ये नमुद केलेला आहे. शपथपत्रामध्ये गट क्रमांक ७५६ मधील ५१ आर शेतजमीन या मिळकतीचा उल्लेख आहे. वादी हे माझे सासरे आहेत. खरेदीखताचा मोबदला रक्कम रु. २५,०००/- इतकी ठरला होता व ती रक्कम माझ्या समक्ष भगवान लहानु शिंदे यांनी खरेदीखतावेळी स्वीकारली होती.

५. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतावेळी वादी यांनी मला केवळ खरेदीखतावर ओळख म्हणुन सही करण्यास सांगितले परंतु, माझेसमक्ष खरेदीखताचा कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९/०३/१९९६ रोजी नोंदविण्यात आलेल्या खरेदीखतास मी ओळख देणार म्हणुन हजर होतो हे मी शपथपत्रामध्ये खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखतावर खरेदी देणार भगवान लहानु शिंदे यांनी माझे समक्ष केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत लिहिताना मी प्रत्यक्ष हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ७५६ मधील उर्वरित क्षेत्रामध्ये वादी यांची पुर्वीपासुन मालकी वहिवाट आहे, हे मी

शपथपत्रामध्ये खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हे माझे सासरे असल्यामुळे त्यांना मदत व्हावी म्हणुन मी आज रोजी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक – १०-११-२०२५

समक्ष श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

ROAC

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.11.10 18:00:24 +0530

**(श्री. पी. व्ही. पाटील)**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

श्रीगोंदा